# करआकारणी व करसंकलन विभाग

| | |
|---|---|
| परिपत्रक स्वरुप | सामान्य करात सूट देणेबाबत |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/9/कावि/204/2022, दिनांक - 15/07/2022 |
| विषय | मालमत्ता कराचे ऑनलाईन पेमेंट करणा-या मालमत्ताधारकास सामान्य करातील सवलतीबाबत |
| कोणाच्या माहितीसाठी | प्रशासन अधिकारी / सहा.मंडलाधिकारी / गट प्रमुख / रोखपाल / उपलेखापाल |
| संदर्भ | 1. परिपत्रक क्रमांक कर/मुख्य/5/कावि/42/2017, दिनांक 08/03/2017<br>2. परिपत्रक क्रमांक कर/मुख्य/9/कावि/222/2020, दिनांक 21/09/2020<br>3. परिपत्रक क्रमांक कर/मुख्य/9/कावि/159/2022, दिनांक 01/06/2022<br>4. मा. प्रशासक यांचेकडील मा. महापालिका सभा ठराव क्रमांक 104, दिनांक 05/07/2022 |

परिपत्रक

कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत शहरातील इमारत व जमिनीवर मालमत्ता कराची आकारणी व वसूलीची कार्यवाही करणेत येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 140 नुसार मालमत्ता करामध्ये सूट / सवलत देणेबाबत तरतूद नमूद आहे. त्यानुसार मालमत्ताधारकांची विहित वेळेत कराचा भरणा करावा व मनपाचे उत्पन्न वाढीचे दृष्टीने विविध प्रोत्साहनपर कर सवलती महानगरपालिकेमार्फत दिलेल्या आहेत. मा. प्रशासक यांचेकडील मा.महापालिका सभा ठराव क्रमांक 51, दिनांक 10/05/2022 नुसार मालमत्ताधारक मालमत्ता कराचा भरणा ऑनलाईन पध्दतीने 30 जून पूर्वी करतील अशा मालमत्ताधारकांना सन 2022-2023 पासून चालू मागणीतील सामान्य करात 5% सवलत देणेत येत आहे. परंतु जास्तीत जास्त नागरिकांना ऑनलाईन पध्दतीने भरणा करावा याकरिता संदर्भ क्रमांक 4 चे मंजूर ठरावाचे अनुषंगाने ऑनलाईन पध्दतीने जे मालमत्ताधारक आर्थिक वर्षात मालमत्ता कराचा भरणा करतील अशा मालमत्ताधारकांना सन 2022-2023 पासून चालू मागणीतील सामान्य करात खालीलप्रमाणे सुधारित कर सवलत देय राहिल.

| अ.क्र. | लाभ धारक | सवलत योजना | आर्थिक वर्षाचे चालू मागणीतील सवलत |
|---|---|---|---|
| 1 | ऑनलाईन पेमेंट | थकबाकीसह एक रक्कमी मालमत्ता कराचा भरणा ऑनलाईन पेमेंट गेट-वेद्वारे करणारे मालमत्ताधारक | देय सामान्य कर रक्कमेत<br>1. माहे एप्रिल ते जून अखेर भरणा केल्यास – 5%<br>2. माहे जुलै ते सप्टेंबर अखेर भरणा केल्यास – 4% |

उर्वरीत मालमत्ता कर भरणा अटी व शर्ती पूर्वीप्रमाणे कायम राहतील

(नीलेश देशमुख)
सहाय्यक आयुक्त, कर संकलन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – 411018

प्रति, 1) प्रशासन अधिकारी / सहा.मंडलाधिकारी, -------------- विभागीय कार्यालय

प्रत : 1) मुख्य लेखापरिक्षण विभाग, 2) लेखा विभाग
3) संगणक विभाग 4) मे. टेक 9 प्रा.लि.,पुणे

2/- उक्त नमूद केल्याप्रमाणे सामान्य करातील सवलतीचा लाभ मिळकतधारकांना देणेकामी